
वाढते प्रदूषण यासाठी वृक्षारोपणाची गरज आहे : मेजर शिवाजी पठाडे
PII

• पंढरपूर • सोमवार, १० फेब्रुवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - २६१


लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत दारूबंदीचा ठराव बहुमताने मंजूर
PIII

## » At a Glance

### ५५ वर्षीय इसमाची गळफासाने आत्महत्या



**सांगोला :** अज्ञात कारणावरून ५५ वर्षीय व्यक्तीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. चिकमहूद, ता. सांगोला येथे घडली. अशोक भीमा कांबळे (वय ५५, रा. चिकमहुद) असे मृताचे नाव आहे. याबाबत, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी सांगोला पोलिसांत खबर दिली आहे. चिकमहूद येथील अशोक कांबळे हे कुटुंबासह गावात राहत असून, पत्नी, मुले ऊसतोडणी करण्यासाठी कोल्हापूर येथील साखर कारखान्याकडे गेले आहेत. त्यामुळे ते घरी एकटेच राहत होते.

### संवेदनशील केंद्रांवर फिरणार ड्रोन कॅमेरा



**सोलापूर :** माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे अंतर्गत मंगळवार दि. ११ फेब्रुवारी पासून होणाऱ्या इयत्ता १२ वी परीक्षेसाठी सांगोला तालुक्यातील १० परीक्षा केंद्रावरून ५ हजार २६१ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षा निर्भय व कॉफी मुक्त पार पाडण्यासाठी लागणारी सर्व तयारी करण्यात आली आहे. तालुक्यातील १० केंद्रांवर बैठे पथक, जिल्हा व तालुक्यातील अधिकाऱ्यांची भरारी पथके व पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तर काही संवेदनशील केंद्रांवर अधिकाऱ्यांच्या अचानक भेटीवेळी सोबत ड्रोन कॅमेरा असणार आहे.

### सर्व्हर डाऊन असल्याने फार्मर आयडीचे काम थांबले

**माळशिरस :** शेतकऱ्यांना शासनाच्या वेगवेगळ्या योजनांचा लाभ मिळावा म्हणून फार्मर आयडी काढण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मोठा गाजावाजा करीत माळशिरस तालुक्यात २६ जानेवारी रोजी प्रांताधिकारी, तहसीलदार व अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सदर उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. मात्र, २६ तारखेपासून पिलीव परीसरात कोणत्याही शेतकऱ्यांचा फार्मर आयडी अद्यापही निघालेला नाही. शेतकरी यासाठी महा ई सेवा केंद्राकडे हेलपाटे मारीत आहेत. सर्व्हर सुरू नाही यामुळे पिलीव परिसरातील शेतकरी गेल्या पंधरा दिवसापासून फार्मर आयडी काढण्यापासून वंचित आहेत.

### फसवणूक प्रकरणी एकावर गुन्हा दाखल




**सोलापूर :** शेत जमीन विकत घेण्यासाठी साडेदहा लाख रुपयांचा इसारा घेऊन फसवणूक केल्याबद्दल एका विरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत लक्ष्मण सदाशिव अवसरे (वय 24, राहणार शिवगंगा नगर, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मनोज मलकय्या गुत्तेदार (राहणार औराद, तालुका दक्षिण सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक बिराजदार हे करीत आहेत.

# मोदींच्या परदेशवारीनंतर शपथविधी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यानंतर दिल्लीच्या नवीन मुख्यमंत्र्यांचा शपथविधी समारंभाची तारखी ठरणार आहे. १२ अणि १३ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान मोदी अमेरिका दौऱ्यावर आहेत. त्यामुळे दिल्ली मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी १३ फेब्रुवारीनंतर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्रीपदी कोणाची निवड होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर अतिशी यांनी रविवारी (दि. ९) मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनी राजभवन येथे अतिशी यांचा राजीनामा स्वीकारला. त्यानंतर त्यांनी दिल्लीची सातवी विधानसभा बरखास्त झाल्याची घोषणा केली. आता दिल्लीत भाजपला नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे.

दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी ९ फेब्रुवारी पासून राष्ट्रीय राजधानी प्रदेश दिल्लीची सातवी विधानसभा बरखास्त करत आहे, असे आपल्या आदेशात म्हटले आहे. यानंतर भाजपच्या शिष्टमंडळाने राजभवनात नायब राज्यपालांची भेट घेतली, यानंतर लवकरच दिल्लीच्या नवीन मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीचा मुहूर्त ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शनिवारी (दि.८) दिल्लीच्या मतमोजणीत ७० सदस्यांच्या विधानसभेत ४८ जागा जिंकून २७ वर्षांची प्रतीक्षा संपवून भाजप दिल्लीत पुन्हा सत्तेत आले. गेल्या दशकापासून राजधानी दिल्लीत राज्य करणाऱ्या'आप'ला २२ जागा मिळाल्या आहेत, तर पक्षप्रमुख अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्यासह त्यांच्या प्रमुख नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.




### मुख्यमंत्रीपदाचे दावेदार

मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर न करता भाजपच्या प्रमुख नेत्यांनी उच्चस्तरीय बैठका सुरू केल्या आहेत. ज्यामध्ये पाच नेत्यांची नावे दिल्लीचे नवीन मुख्यमंत्री पदाचे प्रमुख दावेदार म्हणून समोर येत आहेत. नवी दिल्ली मतदारसंघात केजरीवाल यांचा पराभव करून जायंट किलर म्हणून उदयास आलेले पर्वेश वर्मा हे दिल्लीतील संभाव्य मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यांच्या यादीत आघाडीवर आहेत. दिल्ली विधानसभेत विरोधी पक्षनेते म्हणून काम केलेले भाजपचे वरिष्ठ नेते विजेंदर गुप्ता, पूर्वी प्रदेशाध्यक्ष म्हणून काम केलेले प्रमुख ब्राह्मण चेहरा सतीश उपाध्याय, केंद्रीय नेत्यांशी जवळचे संबंध असलेले दिल्ली भाजपचे सरचिटणीस आशिष सूद आणि वैश्य समुदायातील संघाचे मजबूत नेते जितेंद्र महाजन हे देखील इतर दावेदार आहेत. परंतु, दिल्ली भाजपचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा म्हणाले की, मुख्यमंत्री निवडीचा निर्णय पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने घेतला पाहिजे, तसेच सर्वोच्च पदावर नवीन चेहरा येण्याची शक्यताही आहे. तर दिल्लीच्या मुख्यमंत्री पदी महिला उमेदवारावर देखील होऊ शकतात, अशी चर्चा आहे.

## शिर्डीच्या धरतीवर पंढरपुरात दर्शन मंडप उभारणार गुढीपाडवा दिवशी शुभारंभ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पंढरपूर :** विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना तीर्थक्षेत्र शिर्डीच्या धरतीवर दर्शन मंडप उभा करण्यात येणार आहे. यासाठी शासनाने 102 कोटी 75 लाख रुपयाचा निधी मंजूर केला आहे. या कामाची निविदा निघाली असून नवीन वर्ष गुढीपाडवा दिवशी नवीन दर्शन मंडपाच्या कामास सुरुवात करण्यात येणार आहे. यामुळे भाविकांना अत्याधुनिक चांगल्या सोयी सुविधा मिळणार आहेत.
पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. आषाढी कार्तिकी यात्रेत दहा लाखाहून अधिक भाविक येतात. यामुळे दर्शन रांगेतील भाविकांना ऊन, वारा, पाऊस याचा त्रास होऊ नये म्हणून मंदिर समिती वतीने गोपाळपूर रस्त्यावरील रिद्धी सिद्धी गणपती मंदिराजवळ तात्पुरते 10 दर्शन मंडप उभे केले जातात. प्रत्येक वर्षी हे मंडप उभे केले जात असल्यामुळे यासाठी मंदिर

» पान ३ वर

## जनावरांच्या बाजारात एक हजारापेक्षा अधिक जनावरे दाखल ; लाखो रुपयांची उलाढाल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माघी यात्रेनिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती वतीने वाखरी येथे जनावरांचा बाजार भरविण्यात आला होता. या बाजारात 1000 पेक्षा अधिक जनावरे दाखल झाली होती. अनेक जनावरांची विक्री होऊन यातून लाखो रुपयाची उलाढाल झाली.
माघी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. आलेल्या भाविकांमध्ये अनेकजण शेतकरी असतात. विठ्ठलाचे दर्शन झाल्यानंतर भाविक जनावरांच्या बाजारात जाऊन जनावरे खरेदी करतात. ही जनावरे विठ्ठलाचा प्रसाद म्हणून चांगल्या प्रकारे सांभाळ करतात. यामुळे जनावरांच्या बाजारात जनावरांना चांगली मागणी येते. या बाजारात गाय, म्हैस, रेडा अशी जनावरे विक्री केली जातात.



यंदाच्या बाजारात एक हजारापेक्षा अधिक जनावरे दाखल झाली होती. यातील एका जातीवंत वळूला आठ लाखाची मागणी आली होती. मात्र शेतकऱ्यांनी वळू विक्री करण्यास नकार दिला आहे. त्याने आपण वळू चांगल्या प्रकारे सांभाळून तो जातिवंत गाई तयार करण्यासाठी रेतन करण्यासाठी वापरतात असल्याचे सांगितले. बाजारात गाय, म्हैस, रेडा या जनावरांची विक्री दहा हजार ते एक लाख रुपयापर्यंत झाली. यातून लाखो रुपयाची उलाढाल झाली. कृषी उत्पन्न बाजार समितीने बाजारात सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. तसेच खिलार जनावरांचे प्रदर्शन भरविले होते. या प्रदर्शनात अनेक जनावरांनी सहभाग घेतला. यानंतर अनेक जनावरांना पारितोषिके देण्यात आली.



### कुरनूर धरणातून पाणी सोडले

**अक्कलकोट :** मागील महिन्यात कुरनूर धरण कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अखेर कुरनूर धरणातून पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. धरणाचे तीन दरवाजे उघडण्यात आले असून यातून प्रतिसेकंद १२०० क्युसेकने पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती संबंधित प्रशासनाकडून देण्यात आली. मागील हंगामात झालेल्या अत्यल्प पावसामुळे अक्कलकोट तालुक्यात सध्या उन्हाळ्यापूर्वीच काही गावात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## एप्रिलमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक होण्याचे संकेत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** गेल्या तीन वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका रखडल्या आहेत. ओबीसी आरक्षणावरून न्यायालयात सुनावणी सुरू आहे. ही सुनावणी फेब्रुवारी महिन्यात पूर्ण होऊन निकाल अपेक्षित आहे. यानंतर एप्रिल महिन्यात निवडणुका होतील असे संकेत भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.
पुणे येथे एका कार्यक्रमासाठी आले असता ते पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, गेल्या तीन वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ओबीसी आरक्षण रखडल्या आहेत. ओबीसी आरक्षणासाठी न्यायालयात सुनावणी सुरू आहे. ही सुनावणी फेब्रुवारी महिन्यात पूर्ण होऊन निकाल अपेक्षित आहे. यानंतर निवडणूक आयोग राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जाहीर करेल. या निवडणुका एप्रिल महिन्यात होतील असे संकेत बावनकुळे यांनी दिले आहेत. यामुळे त्यांनी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना आगामी निवडणुकीसाठी सज्ज राहावे अशा सूचना दिल्या आहेत.

## शेतकऱ्यांच्या आक्रमकतेनंतर रामपूर तलावातून सोडणार पाणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** आमच्या दोन पिढ्या पाण्याच्या प्रतीक्षेत गेल्या. आता तिसरी पिढीही प्रतीक्षेतच आहे. तिसऱ्या व भावी पिढीसाठी तरी कॅनॉलद्वारे पाणी सोडून त्यांच्या जीवनात आनंद फुलवा, अन्यथा 55-60 वर्षांपूर्वी कालव्यासाठी संपादित केलेल्या आमच्या जमिनी आम्हाला परत द्या, अशी आक्रमक भूमिका शेतकऱ्यांनी घेतल्यानंतर दक्षिण सोलापूर तालुक्यातील रामपूर तलावातून रामपूर, कर्देहळ्ळी, तोगराळी गावासाठी कालव्याद्वारे पाणी सोडण्याचे आश्वासन पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी पी.एम. बाबा यांनी दिले.
रामपूर तलावाशेजारील महादेव मंदिरात रामपूर लघु पाटबंधारे तलावातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याकरिता आयोजित केलेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत कालव्याला पाणी सोडण्याच्या मागणीसाठी शेतकरी आक्रमक झाले होते. परंतु पाणी सोडण्याच्या आश्वासनानंतर शेतकरी शांत झाले व बैठक यशस्वीरीत्या पार पडली.



## NEET UG 2025 अर्ज प्रक्रिया सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** NEET UG 2025 साठी अर्ज प्रक्रिया 7 फेब्रुवारीपासून सुरू झाली असून अंतिम तारीख 7 मार्च 2025 आहे. परीक्षा 4 मे रोजी होईल. पात्रता निकषांनुसार उमेदवारांचे वय किमान 17 वर्षे असावे, कमाल वयोमर्यादा नाही. फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजीसह बारावी उत्तीर्ण आवश्यक. परीक्षा 13 भाषांमध्ये होईल, प्रत्येक बरोबर उत्तरास +4 आणि चुकीसाठी -1 गुण मिळतील. अर्जासाठी neet.nta.nic.in संकेतस्थळाला भेट द्या. एनटीएने अप्पर आयडी अनिवार्य नसल्याचे स्पष्ट केले आहे. NEET गुणांच्या आधारे विविध वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळतो.

## मृत गायकाच्या बँक खात्यातील तीन लाखांची रक्कम हडपली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** येथील एक ज्येष्ठ गायक आणि निवृत्त शिक्षकाच्या निधनानंतर त्यांची काळजी घेणाऱ्या महिलेनेच त्याच्या बँक खात्यावरील तीन लाखांची रक्कम हडपली.
याप्रकरणी मृत गायकाच्या मुलाच्या फिर्यादीनुसार, संबंधित महिलेविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.या संदर्भात तन्वीर यासीन सय्यद (वय ४३, रा. सुविधा टॉवर, पूजानगर, मीरा रोड, मुंबई) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे दिवंगत वडील यासीन सय्यद हे सोलापुरातील सोशल उर्दू प्रशालेत संगीत शिक्षक या पदावर कार्यरत होते. ते उत्कृष्ट गायक होते. प्रति मोहम्मद रफी अशी त्यांची ओळख होती. मोहम्मद रफी कुटुंबीयांसह प्रख्यात संगीतकार नौशाद अली यांच्याशी त्यांचे थेट संबंध होते. त्यांची मुले उच्च शिक्षणासाठी मुंबईत आईसह राहत होती. इकडे निवृत्तीनंतर यासीन सय्यद हे मुंबईतील हवामान मानवत नसल्यामुळे सोलापुरातच एकटे राहत होते. दरम्यान, संगीत कलेच्या माध्यमातून संपर्कात आल्यानंतर यासीन सय्यद हे जुळे सोलापुरात एका सदनिकेत एका महिलेबरोबर एकत्र राहू लागले. वृद्धापकाळात आपल्या वडिलांची दैनंदिन काळजी घेतली जात असल्याने सय्यद कुटुंबीयांची त्यास हरकत नव्हती.

### सचिन कवले यांच्याकडील समाजकल्याणचा पदभार काढला

**सोलापूर :** जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी म्हणून जात पडताळणी समितीकडील सदस्य सचिन कवले यांना देण्यात आलेला अतिरिक्त पदभार गुरुवारी काढण्यात आला आहे. जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी म्हणून अतिरिक्त पदभार दिलेले सचिन कवले यांचा पदभार रद्द करून त्यांच्या ठिकाणी समाज कल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे.तत्कालीन समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांच्यावर कारवाई झाल्यानंतर कित्येक दिवस हे पद रिक्तच होते. त्यामुळे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांच्याकडे पदभार देण्यात आला होता.

## रेल्वे, बस स्थानक हाऊसफुल्ल
## भाविकांनी सुरु केला परतीचा प्रवास...

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** जातो माघारी पंढरीनाथा, तुझे दर्शन झाले आता असे म्हणत पंढरीत आलेल्या लाखो भाविकांनी विठ्ठलाचे दर्शन झाल्यानंतर परतीचा मार्ग धरला आहे. यामुळे रेल्वे स्थानक व बस स्थानक येथे भाविकांची गर्दी झाली असल्याचे दिसून आले. माघी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी सुमारे सहा लाखाहून अधिक भाविक पंढरपुरात दाखल झाले होते. यामुळे हरिनामाच्या गजराने पंढरी नगरी दुमदुमून गेली होती. एकादशी सोहळा शनिवारी पार पडला. या दिवशी भाविकांनी चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेतल्यानंतर दिंडी काढून नगर प्रदक्षिणा केली. यामुळे हरी नामाच्या गजराने पंढरी नगरी दुमदुमून गेली असल्याचे दिसून आले. पंढरीत विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक येणार असल्याने भाविकांना विठ्ठलाचे सुलभ दर्शन मिळावे म्हणून विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने रिद्धी सिद्धी गणपती मंदिराजवळ ज्यादा आठ दर्शन मंडप उभा केले होते. या ठिकाणी भाविकांना पिण्याचे पाणी, चहा, नाष्टा, भोजन सोय व विश्रांती कक्ष उभारण्यात आला होता. याचा लाभ भाविकांनी घेतला. तसेच प्रशासनाने नदीपलीकडील 65 एकर भक्ती सागर येथे दिंडी सोहळ्यांची सोय केली होती. या ठिकाणी 225 पेक्षा अधिक दिंडी सोहळ्यांनी मुक्काम केला होता. सुमारे चार लाख भाविक या ठिकाणी निवासासाठी थांबले होते. येथे प्रशासनाने 24 तास पिण्याचे पाणी, वीज, आरोग्य, सुरक्षा या सुविधा पुरविल्या होत्या. यामुळे भाविकातून समाधान व्यक्त करण्यात आले. गेल्या चार दिवसापासून यात्रेसाठी पंढरीत भाविक दाखल झाले. एकादशी सोहळा केल्यानंतर द्वादशी रविवारी सकाळपासून भाविकांनी परतीचा मार्ग धरला. भाविकांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने जादा चारशे बसेस सोडल्या होत्या तर रेल्वेने जादा फेऱ्या सुरू केल्या होत्या. यामुळे भाविकांची सोय झाली. रविवारी रेल्वे स्थानक, बस स्थानक येथे भाविकांनी परतीच्या प्रवासासाठी गर्दी केली असल्याचे दिसून आले. राज्य परिवहन महामंडळाने भाविकांच्या सोयीसाठी आरक्षणाची सोय केली होती. तसेच बस स्थानकामध्ये सुविधा दिल्या होत्या. यामुळे भाविकातून समाधान व्यक्त करण्यात आले. पंढरीत आलेल्या भाविकांनी विठ्ठलाच्या प्रसादा बरोबर खेळणी, कपडे असे विविध वस्तू खरेदी केल्या. यामुळे बाजारात खरेदीसाठी गर्दी झाली होती. यातून कोट्यावधी रुपयाची उलाढाल झाली आहे. यामुळे व्यापाऱ्यातून आनंद व्यक्त करण्यात आले. यात्रेनिमित्त शहरातील मठ, मंदिर, धर्मशाळा, लॉज हाऊसफुल्ल झाले होते.

### पतीने केली आत्महत्या, पत्नी विरोधात गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**मंगळवेढा :** पत्नीला नांदविण्यासाठी पाठवणार नाही. तिचे दुसरे लग्न लावून देणार आहोत असे सांगून वारंवार फोन करुन शारिरीक व मानसिक त्रास देवून तिचा पती राजेश बाळू शिंदे (वय २५, रा. खडकी ता. मंगळवेढा) याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सुरेश दुर्योधन काळे, मिथुन दुर्योधन काळे, वैशाली दुर्योधन काळे (सर्व रा. औसारी ता. इंदापूर) या तिघाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. अद्यापपर्यंत कोणालाही अटक करण्यात आली नाही. याबाबतचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## यात्रा कालावधीत मटण विक्री; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माघी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरात दिनांक 7 ते 9 फेब्रुवारी या कालावधीमध्ये मटण, मांस विक्री करण्यास बंदी घालण्यात आली होती. तरीही शहरातील जुना करा नाका परिसरात एका दुकानात मटण विक्री होत असल्याचे दिसून आले. यामुळे एका व्यापाऱ्या विरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माघी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक येत असल्यामुळे पंढरपूर शहरात दिनांक 7 ते 9 फेब्रुवारी या कालावधीमध्ये मटण मांस विक्री करण्यास प्रांताधिकारी यांनी बंदी घातली होती. तरीही शहरातील जुना करा




नाका परिसरात असलेल्या शक्ती चिकन अँड मटण सेंटरमध्ये मालक इम्तियाज नाडीवाले दिनांक 7 फेब्रुवारी रोजी मटण विक्री करत असल्याचे आढळून आले. यामुळे पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात पोलीस हेडकॉन्स्टेबल अभिमन्यू गरड यांनी दुकानाचे मालक नाडीवाले यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबतचा पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

**सोलापूर :** भारतीय जनता पार्टीचे सरकार दिल्ली येथे बहुमतामध्ये स्थापन झाल्यावर करमाळा येथील भाजपाकडून कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष साजरा केला. करमाळा येथील भाजपा कार्यालयासमोर भारत माता की जय, जय भवानी जय शिवाजी, भारतीय जनता पार्टीचा विजय असो अशा घोषणा देत फटाक्यांची प्रचंड आतिषबाजी केली.

### बालाजी फाउंडेशन, जीवन सहारा परिवार, अष्टविनायक मंडळ, ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण


# वाढते प्रदूषण यासाठी वृक्षारोपणाची गरज आहे : मेजर शिवाजी पठाडे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क




**माळशिरस :** बालाजी फाउंडेशन देडगावं, जीवन सहार परिवार व अष्टविनायक मंडळ,संग्रामनगर व संगमनगर ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने संग्राम नगर ग्रामपंचायत हद्दीतील गुरुमाऊली ते महादेव मंदिर संग्रामनगर या ठिकाणी रविवार दिनांक ०९/०२/२५ रोजी वृक्षारोपण करण्यात आले यामध्ये वड, पिंपळ,भेंडी अश्या ऑक्सीजन देणाऱ्या मोठ्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. काळाची गरज व वाढते प्रदूषण याला आळा घालण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये वृक्षारोपण का गरजेचे आहे याविषयी उपस्थित लोकांना महत्त्व पटवून देण्यात आले येणाऱ्या काळामध्ये आणखी वृक्षारोपण संस्थेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे .सदर कार्यक्रमासाठी जीवन सहारा परिवार चे अध्यक्ष सागर फडे व सर्व सदस्यांनी श्रमदान करून वृक्षारोपण केले . बालाजी फाउंडेशनचे मेजर शिवाजी पठाडे यांनी मोलाचे सहकार्य केले .यावेळी संग्रामनगर गुमास्ता कॉलनी येथील ग्रामपंचायत सदस्य बापू वैद्य,सुदेश रासकर,अमित दोशी ,मयूर फडे,गौरव फडे,योगेश गांधी ,सत्यजित दोशी, सतीश दोशी, पियुष दोशी,तसेच मंडळाचे रोहित पिंपरकर,विजय देवळे,राहुल नागणे,प्रफुल्ल काटकर,महेश म्हेत्रे, पारस खडके,सुजित बामणकर,तेजस उपाध्ये,यश शिरढोणे,सचिन बोरावके यांनी वृक्षारोपणसाठी परिश्रम घेतले. या उपक्रमासाठी संग्रामनगर ग्रामपंचायत व जीवन सहारा परिवार ,बालाजी फाउंडेशन यांचे विशेष सहकार्य लाभले

### पर्यावरण रक्षक: मेजर शिवाजी पठाडे यांचा प्रेरणादायी प्रवास



मेजर शिवाजी पठाडे हे भारतीय सैन्यातील एक कर्तव्यदक्ष अधिकारी असून, देशसेवेसोबतच पर्यावरण रक्षणासाठी देखील ते अथक परिश्रम घेत आहेत. सैन्यातील जबाबदाऱ्या सांभाळून सुट्टीच्या काळात ते वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे कार्य करतात. 2017 पासून त्यांनी सुरू केलेल्या या चळवळीत आतापर्यंत लाखो झाडे लावली आणि ती जगवली आहेत. त्यांनी नगर, पुणे, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांत बालाजी फाउंडेशनच्या माध्यमातून हे कार्य यशस्वीपणे पुढे नेले आहे.मेजर पठाडे यांचे उद्दिष्ट केवळ वृक्षारोपण करणे नाही, तर पुढील पिढ्यांसाठी एक समृद्ध, हरित आणि प्रदूषणमुक्त पर्यावरण निर्माण करणे आहे. त्यांनी 'ऑक्सिजन पार्क', 'शौर्य सृजन बाग' 'श्रीराम वन वाटिका', 'पावन गणपती वडराई प्रोजेक्ट', 'यशवंत ऑक्सीजन पार्क', 'पद्मश्री पोपटराव पवार उद्यान', आणि इतर अनेक पर्यावरणपूरक प्रकल्प हाती घेतले आहेत. या उपक्रमांमधून ते समाजाला निसर्गसंवर्धनाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करत आहेत.

## छावा चित्रपट करमुक्त करा




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मराठा सम्राट छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित आगामी भारतीय हिंदी भाषेतील ऐतिहासिक चित्रपट छवा हा येत्या 14 फेब्रुवारी 2025 रोजी सर्व चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची उत्सुकता अनेकांना लागलेली असून छत्रपती संभाजी महाराज यांच्या जाज्वल्य जीवन चरित्रावरील हा चित्रपट महाराष्ट्रातील जनतेला पाहण्यासाठी कर मुक्त करावा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने संभाजी ब्रिगेडची पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई-मेल द्वारे केली आहे.

Selected

## ग्रामीण पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**सोलापूर :** सोलापूर तालुका, पोलीस ठाणे येथे बेवारस अवस्थेत पडलेल्या चारचाकी व दुचाकी वाहनांबाबत सोलापूर ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. पोलिसांनी म्हंटले आहे की, चारचाकी व दुचाकी वाहनांचा मालकी हक्क कोणीही सांगितला नाही अशी चारचाकी वाहने व दुचाकी वाहने सोलापूर तालुका, पोलीस ठाणे येथे बऱ्याच कालावधी पासुन पडुन आहेत. अशा ज्या कोणाचे चारचाकी / दुचाकी वाहने असतील त्यांनी त्यांच्या मालकी हक्काचे पुरावे / कागदपत्रे घेऊन सोलापूर तालुका, पोलीस ठाणे येथुन ओळख पटवावी आणि घेऊन जावे.

## इलेक्ट्रो प्रदर्शनाचे यंदा रौप्य महोत्सवी वर्ष

Electro 25

**सोलापूर :** सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशन द्वारा इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, टेलिकम्युनिकेशन, होम अप्लायन्सेस, सोलार सिस्टम, फिटनेस इक्विपमेंटसचे भव्य प्रदर्शन इलेक्ट्रो २०२५ चे आयोजन केले गेले आहे. दि. १२ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत होम मैदानावर हे प्रदर्शन भरणार असल्याची माहिती सेडाचे अध्यक्ष आनंद येमुल यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदा इलक्ट्रो प्रदर्शनाचे शार्प हे मुख्य प्रायोजक तर हाईफा इलेक्ट्रिकल्स् व एमआयटी विश्वप्रयाग युनिर्व्हसिटी हे सह प्रायोजक असणार आहेत.

## अवैध हातभट्टी दारू विक्री जोमात; अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राज्य उत्पादन शुल्क विभाग प्रामुख्याने मद्यार्कयुक्त अंमली पदार्थांवर उत्पादन शुल्क जमा करण्याचे काम करतो. तसेच अशा मद्यार्कयुक्त पदार्थांवर नियंत्रण ठेवण्याचे कामकाज या विभागमार्फत केले जाते. सदरचा उद्देश हा मद्यार्कयुक्त पदार्थांची निर्मिती, वाहतुक, विक्री, बाळगणे, आयात, निर्यात इत्यादीसाठी विविध अनुज्ञप्ती (परवाने) मंजुर करण्याचे काम करते. या कार्यालय मार्फत अकलूज, माळशिरस, नातेपुते, वेळापूर, व माढा तालुक्यातील टेंभुर्णी पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या गावातील कामकाज पाहिले जाते.

## माळशिरसचा टंचाई पूरक आराखडा पूर्ण



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** माळशिरस तालुक्यातील २८ गावांच्या २०२ वाड्या- वस्त्यांकरिता ३१ टँकरसाठी जानेवारी ते जून महिन्याचा १०८. ९० लाखांचा, एप्रिल ते जून महिन्यात ५२ गावांतील ४०५ वाड्या- वस्त्यांसाठी ६० टँकर व विहीर अधिग्रहणासाठी २४२. ४६ लाखांचा टंचाई पूरक आराखडा ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग माळशिरसने केल्याची माहिती गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी दिली.

## हुरडा पार्टीसाठी गर्दी...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील चिंचणी गावाने मिनी महाबळेश्वर असा नावलौकिक निर्माण केला आहे. या ठिकाणी साधारण डिसेंबरपासून हुरडा पार्ट्यांचा हंगाम वेग घेऊ लागतो. ज्वारीच्या हिरव्यागार कणसांनी डोलणारी शेवारे, हुरड्यासाठी पेटविलेल्या आगट्या, त्यात भाजली जाणारी कोवळी कणसं, गरमागरम झाल्यानंतर हातावर चोळून तयार झालेला लुसलुशीत हुरडा खाण्यासाठी चिंचणी या गावात पर्यटकांची गर्दी होत आहे.

## आमदार देशमुख यांनी मानले मंद्रूपकरांचे आभार



**सोलापूर :** विधानसभा निवडणुकीत दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील मंद्रूपमधील सेवालाल नगर येथील नागरिकांनी आपल्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल आमदार सुभाष देशमुख यांनी त्यांचे आभार मानले आहेत. आपल्या दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहील, असा विश्वास यावेळी त्यांनी ग्रामस्थांना दिला. यावेळी तालुका अध्यक्ष संगप्पा केरके, गौरीशंकर मेंडगुदले, यतीन शहा, अमृता चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, बाबू चव्हाण, विलास चव्हाण, संजय राठोड, शिवाजी चव्हाण, सागर चव्हाण उपस्थित होते.

## पानीव फार्मसीमध्ये कौशल्य विकास कार्यशाळा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** श्रीराम शिक्षण संस्था संचालित फार्मसी कॉलेज पानीव मध्ये तृतीय वर्ष बी. फार्मसी, अंतिम वर्ष बी. फार्मसी व डी. फार्मसी च्या विद्यार्थ्यांसाठी इन्फोसिस फाऊंडेशनच्या ॲस्पिर हेअर उपक्रमांतर्गत बेळगाव येथील पॅसिफिक टेक्नॉलॉजीचे कुणाल दुलबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली रोजगारक्षमता कौशल्य विकासावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

**माळशिरस :** श्रीराम शिक्षण संस्था संचालित फार्मसी कॉलेज पानीव मध्ये तृतीय वर्ष बी. फार्मसी, अंतिम वर्ष बी. फार्मसी व डी. फार्मसी च्या विद्यार्थ्यांसाठी इन्फोसिस फाऊंडेशनच्या ॲस्पिर हेअर उपक्रमांतर्गत बेळगाव येथील पॅसिफिक टेक्नॉलॉजीचे कुणाल दुलबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली रोजगारक्षमता कौशल्य विकासावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत पहिल्या दिवशी कम्युनिकेशन, स्किल सॉफ्ट स्किल व त्याचे करियरमध्ये महत्त्व यावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी मुलाखतीसाठी तयारी, संवाद कौशल्ये, आत्मविश्वास वाढवणे आणि व्यावसायिक जगासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. तिसऱ्या दिवशी मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन आणि प्रेझेंटेशनसारख्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. या कार्यशाळेमध्ये एकुण १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, उपाध्यक्ष करण पाटील, मार्गदर्शक श्रीलेखा पाटील, सचिव ॲड. अभिषेक पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी दिनेश शिंदे, प्राचार्य डॉ. स्वप्नील फडे, प्रा. पंकज खुसपे यांनी सहभाग नोंदवला.

## जास्तीत जास्त विकासकामे करण्यावर भर देणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर विधानसभेच्या निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर नागरिकांचे आभार मानण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख यांनी मतदार संघातील चैतन्य शॉपिंग सेंटरला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधत आपल्यावर ठेवलेल्या विश्वासाबद्दल मनःपूर्वक आभार मानले. तसेच येणाऱ्या काळात जास्तीत जास्त विकास कामे याही परिसरात होतील अशी ग्वाही यावेळी दिली. याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिल्लीतील विजयाचा सोलापुरात भाजपकडून जल्लोष साजरा




**सोलापूर :** दिल्ली येथे पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने ऐतिहासिक विजय मिळविला. या विजयाचा जल्लोष भाजपा सोलापूर शहराच्यावतीने कन्ना चौकात साजरा करण्यात आला. याप्रसंगी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणा देत व एकमेकांना मिठाई भरवत आनंद साजरा केला. याप्रसंगी जय साळुंखे, रोहिणी तडवळकर, प्रा. डॉ. नारायण बनसोडे, पांडुरंग दिड्डी, विशाल गायकवाड, विजया वडेपल्ली, राजकुमार पाटील, संजय कोळी, बजरंग कुलकर्णी, सुनील गौडगाव, सुधाकर नराल आदी उपस्थित होते.




### वैज्ञानिक प्रकल्प बांधणी स्पर्धेत

# अंबिकानगर झेडपी शाळा प्रथम; सर्वत्र अभिनंदन !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सोलापूर येथे घेण्यात आलेल्या शालेय विध्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रकल्प बांधणी व सादरीकरण स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा अंबिका नगर तालुका उत्तर सोलापूर या शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे.

सोसायटी ऑफ आटोमोटिव्ह इंजिनिअर्स इंडिया, महिंद्रा राईज व आविम सोलापूर ओलंम्पिक्स सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्कीमर व जेट टॉय असे हवेवर चालणाऱ्या वैज्ञानिक खेळणी व उपकरणांचे सादरीकरण विध्यार्थ्यांनी केले आहे. उपकरणाचे वेग, वळण व वजन नेण्याची क्षमता यावरील वैज्ञानिक तत्व वापरून निर्मिती विध्यार्थ्यांनी स्वतः केली व त्याचे सादरीकरण उत्कृष्ट पद्धतीने केले. या स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील नामवंत शाळा सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेत सहभागी होणारी जिल्हा परिषद शाळा अंबिकानगर ही एकमेव जिल्हापरिषद शाळा होती. पहिल्यांदाच सहभागी होऊन शाळेने जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकावले आहे. त्यामुळे सिम्बायसिस इन्स्टिट्यूट पुणे येथे होणाऱ्या राज्य स्तर स्पर्धेसाठी शाळेची निवड झाली आहे.

याबद्दल शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. या स्पर्धेत जेट टॉय स्पर्धेत वैष्णवी कवडे,गणेश एडके, आर्यन कवडे, श्रुती राऊत व आरव बोराडे हे सहभागी होते. त्याचप्रमाणे स्कीमर स्पर्धेत अक्षता राठोड, स्वरा राऊत, शहाना शेख, श्रद्धा कारंडे व साहिल सय्यद हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

पंढरी संचार

**करमाळा :** करमाळा पोलीस स्टेशनच्या वतीने करमाळा पंचायत समिती सभागृहात पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले होते. या तक्रार निवारण दिनावेळी अनेक तक्रारींचा निपटारा यावेळी करण्यात आला असून पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी दिली.

### अवैध धंदे व दारु विक्री संदर्भात विशेष बैठकीचे आयोजन

# लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत दारूबंदीचा ठराव बहुमताने मंजूर

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतीने हद्दीतील अवैद्य दारू विक्री व दारू दुकाने, ताडी विक्री कायमची बंदर करण्याबाबत रविवारी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच संजय साठे यांच्या अध्यक्षतेखाली दारूबंदीचा ठराव मांडला होता. या ठरावाला उपस्थित सर्व ग्रामस्थांनी हात वर करून ठरावाच्या बाजूने मतदान केले तर ठरावाच्या विरोधात एकही मतदान न झाल्याने सदरचा ठराव एकमताने मंजूर झाल्याचे जाहीर करण्यात आले. याप्रसंगी सरपंच संजय साठे, उपसरपंच सौ.रुपाली कारंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास ढोणे, जिल्हा नियोजन समिती सदस्य, शिवसेना सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, तंटामुक्त अध्यक्ष संभाजी कदम, सुरेश टीकोरे, आबासो पवार, विलास देठे, पोलीस पाटील इरकल मॅडम, ग्रामपंचायत सदस्य औदुंबर ढोणे, समाधान देठे, गोवर्धन देठे, सागर सोनवणे, आशाबाई देवकते, विजयमाला वाळके, नंदकुमार वाघमारे, माजी उपसरपंच सचिन वाळके, अनिल सोनवणे, महादेव पवार, ग्राम विकास अधिकारी जयवंत खंडागळे यांच्यासह लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत हद्दीतील मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

अनेक वर्षांपासून लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत हद्दीमध्ये मनुष्यवस्तीत दारू विक्री केली जात असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याच्या तक्रारी ग्रामपंचायतीकडे ग्रामस्थांकडून करण्यात आल्या होत्या. याबाबत गांभीर्याने लक्ष देऊन सरपंच संजय साठे यांनी दारूबंदीचा धाडसी निर्णय घेत दारूवर टाकू बहिष्कार व्यसनमुक्तीचा करू पुरस्कार हे ब्रीदवाक्य घेऊन लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतने रविवारी विशेष ग्रामसभेचे आयोजन अण्णाभाऊ साठे प्रशाले समोर करण्यात आले होते.

यावेळी दारूबंदी बाबत ठराव मांडल्यानंतर उपस्थित सर्व ग्रामस्थांनी हात वर करून दारूबंदी करण्याबाबत मतदान केले. सदर ठरावाच्या विरोधात एक हि मतदान न झाल्याने सदरचा ठराव बिनविरोध बहुमताने संमत करण्यात आल्याचे ग्रामविकास अधिकारी जयवंत खंडागळे यांनी जाहीर केले. या विशेष ग्रामसभेनंतर सरपंच, उपसरपंच आणि सर्व सदस्यांचे सर्व ग्रामस्थांच्या वतीने आभार मानण्यात आले.



**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतीने हद्दीतील अवैद्य दारू विक्री व दारू दुकाने, ताडी विक्री कायमची बंदर करण्याबाबत रविवारी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच संजय साठे यांच्या अध्यक्षतेखाली दारूबंदीचा ठराव मांडला होता. याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी, सर्व सदस्य तसेच परिसरातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलिसाला मारहाण प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहर वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यास शिवीगाळ करून मारहाण केल्याबद्दल दोघांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत दक्षिण शहर वाहतूक नियंत्रण शाखेतील पोलीस नाईक रविराज श्याम कांबळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून प्रथमेश जेटीथोर, बाबासाहेब जेटीथोर ( दोघे रा. देशमुख पाटील वस्ती, हौसे वस्ती ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रथमेश व बाबासाहेब यांनी पोलिसांशी हुज्जत घालत त्यांना शिवीगाळ केली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. याबाबतचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

» पान १ वरुन

## शिर्डीच्या धरतीवर पंढरपुरात दर्शन मंडप...

समितीला लाखो रुपयांचा खर्च करावा लागतो. पंढरीत येणाऱ्या भाविकांना तीर्थक्षेत्र शिर्डी प्रमाणे दर्शनाची व्यवस्था व्हावी यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रयत्न करून शासन दरबारी प्रस्ताव पाठविला. याची दखल घेऊन शासनाने 102 कोटी 75 लाख रुपयाचा प्रस्ताव मंजूर केला असून याची निविदा निघाली आहे. मराठी नवीन वर्ष गुढीपाडवा 30 मार्च रोजी असून या दिवशी नवीन दर्शन मंडपाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. तसेच सारडा भवन ते दर्शन मंडपा पर्यंत स्कायवाक करण्यात येणार आहे. यामुळे दर्शन रांगेत घुसखोरी होणार नसून भाविकांना चांगल्या सोयी सुविधा मिळणार आहेत. तीर्थक्षेत्र पंढरपूरकडे केंद्र व राज्य शासनाने लक्ष केंद्रित केले असून येथे येणाऱ्या भाविकांना अत्याधुनिक सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. याच धरतीवर कॉरिडॉर तयार करण्यात आला असून लवकरच याचाही शुभारंभ करण्यात येणार आहे. यामुळे पंढरीत येणाऱ्या भाविकांची संख्या वाढण्यास मदत होणार असून अर्थकारणाला चालना मिळणार आहे.

» Selected

## शेतकऱ्यांसोबत एमआयडीसीबाबत सकारात्मक चर्चा



**पंढरपूर :** एमआयडीसी उभारण्यासाठी पंढरपूर तालुक्यातील आढीव, बाभुळगाव, मेंढापूर आणि गुरसाळे येथील शेतकऱ्यांशी मोकळेपणानं चर्चा केली. गावाच्या पुढच्या पिढीला उद्योगधंद्याच्या माध्यमातून मजबूत आधार देण्यासाठी सर्वजण पुढं येत आहेत याचा आनंद असे प्रतिपादन आमदार अभिजीत पाटील यांनी केले. उद्योगधंदे आले की, गावातच मोठा व्यापार वाढेल, रोजंदारी वाढेल आणि लोकांच्या हाताला काम मिळेल. वीज, रस्ते, पाणी यासारख्या सुखसोयी सुधारल्या की गावात सुखाचं जीवन उभं राहील असा ठाम विश्वास आहे.

## आमदार देशमुख यांनी साधला नागरिकांशी संवाद



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे आमदार सुभाष देशमुख यांनी सोलापूर शहर दक्षिण मधील समर्थ सोसायटी येथे भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. यावेळी सोसायटीमध्ये असणाऱ्या अडीअडचणीबाबत येथील महिला रहिवाश्यांनी आपले प्रश्न मांडले. हे प्रश्न लवकरच सोडविण्यात येतील. तसेच येणाऱ्या काळात जास्तीत जास्त विकास कामे या परिसरात होतील, अशी ग्वाही नागरिकांना दिली. यावेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## फुलदाणी अर्पण...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस शुभांगी संजय गुरव यांनी सुमारे 4 किलो वजनाच्या चांदीच्या दोन फुलदाणी अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. त्याबद्दल मंदिरे समितीच्या वतीने देणगीदार यांचा मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे यांनी श्री विठ्ठलाची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

## दीपक तलवाड यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला



**बार्शी :** बार्शी शहरातील हॉटेल टुरिस्ट लॉजमध्ये चालवण्यात येणाऱ्या अत्यंत गंभीर स्वरूपाच्या अनैतिक व्यवसायप्रकरणी मुख्य संशयित हॉटेल मालक दीपक सोमनाथ तलवाड (वय ४२) याचा अटकपूर्व जामीन अर्ज बार्शी सत्र न्यायालयाने धुडकावून लावला आहे. या खळबळजनक प्रकरणात न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की, अर्जदाराचा थेट सहभाग असून त्याच्या चौकशीसाठी पोलीस कोठडी आवश्यक आहे.

## सचिन सर्जेराव खिलारी यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न !



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** भारताची दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या श्री क्षेत्र पंढरपूर येथे माघ शुद्ध एकादशीला शनिवार दिनांक ०८/०२/२०२५ रोजी लोणारी समाजाचे महान संत वै. भिमदास महाराज करांडे यांच्या मठामध्ये या मठाचे मठाधिपती ह. भ. प. अंबादास महाराज करांडे यांच्या हस्ते भव्यदिव्य जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला या वै. भिमदास महाराज करांडे यांच्या संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश भागातील बाबांचे शिष्यगण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

तसेच पंढरपूर मठाचे अध्यक्ष मा. बाळासाहेब गोडसे, सचिव मा. नवनाथ रानगट, उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरज बाड, श्री. जितेंद्र लोणकर ( लोणारी ) इतर बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते.

## आ.पाटील यांनी केला संकल्प



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** लोकांचं प्रेम काय असतं, हे पुन्हा अनुभवायला मिळालं. मोठ्या जल्लोषात, घोड्यावरून, बग्गीतून आणि हालगीच्या तालावर आमदार म्हणून निवडून आल्यानंतर बावी येथे स्वागत केलं. बावीला पाणी आणल्याशिवाय गावात फेटा बांधणार नाही! हा संकल्प आमदार अभिजीत पाटील यांनी केला. तो पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. बावीकरांचं प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद हीच खरी ताकद आहे. यातूनच अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळते.

## संभाजी शिंदे यांनी दर्शन रांगेस भेट देऊन वारकरी भविकांशी साधला संवाद



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माघ शुद्ध जया एकादशीचा मुख्य सोहळा संपन्न होत असून, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर व दर्शन रांगेत भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे आणि सर्वत्र पुंडलिक वरदे हरी विठ्ठल असा जयघोष सुरू आहे.

मंदिर समितीमार्फत दर्शन रांगेत पिण्याचे पाणी, पत्रा शेड, बेरिकेटिंग, चांगली स्वच्छता व्यवस्था, सुरक्षा, चहा खिचडी वाटप व इतर अनुषंगिक पुरेशा प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या सोयी सुविधांचा आढावा घेतला.

## शिवशाही टी स्टॉलसमोर वादातून युवकावर हल्ला



**बार्शी :** बार्शी शहरातील बाळेश्वर नाका परिसरात शिवशाही टी स्टॉलसमोर वादातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी हनुमंत सुधीर घळके (रा. कव्हे, ता. बार्शी) आणि त्याच्या साथीदाराविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हवालदार विश्वजीत ठोंगे हे करीत आहेत.




### मुंबई येथील एका कार्यक्रमात दिला पुरस्कार

# पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँके ला आदर्श बँक पुरस्कार प्राप्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को. ऑफ असोसिएशन सोलापूर च्या वतीने पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक पंढरपूर या बँकेला आदर्श बँक म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दि. पंढरपूर को-ऑपरेटिव्ह मर्चंट बँक या बँकेने आजपर्यंत सर्वसामान्य सभासद व ग्राहकांना तत्पर सेवा व बँकिंग क्षेत्रातील सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे व ग्राहकांमध्ये नावलौकिकास पात्र ठरलेल्या या बँकेला आदर्श बँक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ठेवी 201 ते 500 कोटी पर्यंत विभाग यामध्ये दि. पंढरपूर को-ऑपरेटिव मर्चंट बँक या बँकेला तृतीय क्रमांक मिळाला असून या दि. पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक पंढरपूर या बँकेला आदर्श बँक हा पुरस्कार दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव बँक फेडरेशन लिमिटेड मुंबई चे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.



याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यमंत्री आमदार विजयकुमार देशमुख तसेच दि. पंढरपूर को-ऑपरेटिव्ह मर्चंट बँकेचे माजी चेअरमन नागेश काका भोसले माजी चेअरमन सोमनाथ डोंबे संचालक विजयकुमार परदेशी बँकेचे अध्यक्ष शितल तंबोली, उपाध्यक्ष वसंत शिखरे, राजेंद्र फडे, संजय जवंजाळ, भगिरथ म्हमाणे,सौ. मंजुश्री भोसले,तज्ञ संचालक सुनील मोहिते. पंढरपूर मर्चंट को ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापक अतुल म्हमाणे ,सह.व्यवस्थापक रमेश कुलकर्णी.. आदी मान्यवर उपस्थित होते

